५७

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

परिपत्रक क्र.१६६

विषय : ई-निविदा कार्य प्रणालीनुसार अंमलबजावणी करावयाच्या कामांच्या वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/का-३९, दि.१८.१२.१४
२) शासन निर्णय क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/का-३४, दि. ३१.८.२००९

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये रु.३ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू करण्याविषयीच्या सूचना शासनाने निर्गमित केल्या आहेत. ई- निविदा कार्यप्रणाली असली तरी अशा निविदांची संक्षिप्त जाहिरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करावयाची आहे.

संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये निविदाच्या जाहिराती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्याविषयी सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, या प्रमाणे निविदा सूचना प्रसिध्दीबाबत क्षेत्रीय कार्यालयामार्फत कार्यवाही करताना अनेक वेळा कमी खप/ महत्त्व/प्रसिध्दी असलेल्या वर्तमान पत्रामध्ये निविदा सूचनांची जाहिरात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

वरील बाब विचारात घेता, निविदांच्या जाहिराती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. कन्सल्टन्सी संबंधीची सर्व जाहीराती राष्ट्रीय स्तरावरील दैनिकामध्ये प्रसिध्दीस देण्यात याव्यात.
२. योजनांच्या जाहीराती प्रसिध्द करण्याविषयी खालील निकषाचे अनुपालन करण्यात यावे.

| अ.क्र. | निविदेतील कामाच्या अंदाजीत किमतीची मर्यादा | राष्ट्रीय स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | राज्य स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | जिल्हा स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र |
|---|---|---|---|---|
| १. | रु.१० लक्ष पर्यंत | निरंक | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र |
| २. | रु.१० लक्षच्यावर व रु.१० कोटी पर्यंत | निरंक | अ) १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र<br>ब) १ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र (राज्यस्तरीय आवृत्ती) | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | रु.१० कोटी पेक्षा जास्त व रु ५० कोटीच्या आत | १ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र (राष्ट्रीय आवृत्ती) | २ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र | निरंक |
| ४ | रु.५० कोटी पेक्षा जास्त | २ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र (राष्ट्रीय आवृत्ती) | २ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र (राज्यस्तर आवृत्ती) | निरंक |

**टिप :** मराठी/इंग्लीश दैनिक वर्तमान पत्र त्या-त्या स्तरावरील ( देश/राज्य/जिल्हा) जास्त खपाची असावीत.

३. प्रारुप निविदा प्रपत्रे मंजूर करणारे अधिकारी यांनी निविदा प्रसिध्दीच्या जाहीरातीचा मसूदा मंजूर करावी. तदनंतरच निविदा प्रसिध्दीबाबत कार्यवाही करावी.

४. जाहीराती प्रसिध्द होण्याच्या २४ तास आधी निविदा संच तयार असेल याची दक्षता घ्यावी.

५. निविदा सूचना प्रसिध्दीबाबतचा नमुना या सोबत पाठविण्यात येत आहे. जाहिरात ही संक्षिप्त असावी. त्यामध्ये कामाचे नांव/ठिकाण/किंमत तसेच कार्यालयाचे नांव इ. बाबी नमूद कराव्यात. सविस्तर निविदेसाठी ई-टेंडर वेबसाईट पहाणेबाबत सुचनेचा समावेश करावा. निविदा सुचनेच्या जाहिरातीचा वर्तमान पत्रातील जाहिरातीचा आकार हा साधारणतः ९.५ X ६.० चौ.से.मी. एवढा असावा. वेबसाईटवर सविस्तर माहिती दिलेली असल्याने विनाकारण इतर माहिती जाहिरातीमध्ये देण्याची गरज नाही. कारण त्यामुळे जाहिरातीचा आकार वाढवून त्याचे शुल्कही मोठ्या प्रमाणात वाढते.

६ मराठी वर्तमान पत्रातील जाहिरात मराठीमध्ये तर इंग्रजी वर्तमान पत्रातील जाहिरात इंग्रजीमध्ये असावी.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(संतोष कुमार) ३/९/१५
सदस्य सचिव

मजीप्रा/सस/तांशा-२/३५० /९७१ दिनांक : २.०९.२०१५

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी : सहपत्रासह**

- संचालक (तांत्रिक), मजीप्रा, मुंबई
- संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, मजीप्रा,ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
- अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद / नांदेड/ लातूर/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर/ अकोला
- अधिक्षक अभियंता, म.नि.सं.व सं.कक्ष,ठाणे
- अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परिक्षण पथक,ठाणे.
  सदर परिपत्रक मजीप्राच्या वेबसाईटमध्ये अपलोड करावे.
- कार्यकारी अभियंता (सर्व)

(१२)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


## परिपत्रक क्र.१६६ चे शुध्दीपत्रक

**विषय** : ई-निविदा कार्य प्रणालीनुसार अंमलबजावणी करावयाच्या कामांच्या वृत्त पत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीबाबत.

**संदर्भ** : १) या कार्यालयाचे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/९७९ दि.२.९.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र.१६६.
२) दि.६.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या मजीप्राच्या १३४ व्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र.१६६ नुसार, ई- निविदांच्या जाहिराती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्याच्या संदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

दि.६.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या मजीप्राच्या १३४ व्या बैठकीत या संदर्भात प्राप्त झालेल्या सूचनेनुसार, या बाबत परिपत्रक क्र.१६६ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या जाहीराती प्रसिध्द करण्याविषयीच्या निकषामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

योजनांच्या जाहीराती प्रसिध्द करण्याविषयी खालील निकषाचे अनुपालन करण्यात यावे.

| अ. क्र. | निविदेतील कामाच्या अंदाजीत किमतीची मर्यादा | राष्ट्रीय स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | राज्य स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | जिल्हा स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र |
|---|---|---|---|---|
| १. | रु.१० लक्ष पर्यंत | निरंक | ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. | ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. |
| २. | रु.१० लक्षाच्या वर व रु.१० कोटीपर्यंत | निरंक | अ) ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने.<br>ब) ३ सर्वात जास्त खपाच्या इंग्रजी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने.<br>(राज्यस्तरीय आवृत्ती) | ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. |
| ३. | रु.१० कोटी पेक्षा जास्त व रु.५० कोटीच्या आत. | ३ सर्वात जास्त खपाच्या इंग्रजी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. (राष्ट्रीय आवृत्ती) | ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. | निरंक |

(७०)

| अ. क्र. | निविदेतील कामाच्या अंदाजीत किमतीची मर्यादा | राष्ट्रीय स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | राज्य स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | जिल्हा स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र |
|---|---|---|---|---|
| ४. | रु.५० कोटी पेक्षा जास्त. | ३ सर्वात जास्त खपाच्या इंग्रजी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. (राष्ट्रीय आवृत्ती) | ३ सर्वात जास्त खपाच्या मराठी वर्तमान पत्रापैकी एक वर्तमान पत्रात क्रमा-क्रमाने रोटेशन पध्दतीने. (राज्यस्तरीय आवृती) | निरंक |

वरील निकषांमधील बदलांव्यतिरिक्त परिपत्रक क्र.१६६ मधील इतर बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याचे पालन न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर म.ना.से. नियमामधील तरतूदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ९३५८
दि.७ डिसेंबर, २०१५

**प्रत माहितीसाठी सादर :**

- मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, ७ वा मजला, जी.टी. रुग्णालय इमारत, मुंबई-४००००१.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गु.प.प., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/ पुणे/ सांगली/औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला /नागपूर/चंद्रपूर
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वि., ठाणे/ अंबरनाथ (जव्य)/ विरार (जव्य)/ पनवेल (जव्य)/ माणगांव/ रत्नागिरी/ओरस कणकवली/ पुणे-१/ पुणे-२/ कराड/ सातारा (जव्य)/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ औरंगाबाद / बीड/ जालना / लातूर/ उस्मानाबाद / नांदेड / परभणी / जळगाव / नाशिक/ नाशिक (जव्य)/ अहमदनगर/ संगमनेर / अमरावती / अमरावती (जव्य) / यवतमाळ / अकोला / वाशिम / बुलढाणा/ नागपूर / नागपूर (जव्य) / गोंदिया / चंद्रपूर / वर्धा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१ रवाना 0 8 DEC 2015